केसरी पुणे (अहमदनगर आवृत्ती) २१ सप्टेंबर २०१६/६



# ‘मिटकॉन’तर्फे सौर ऊर्जा प्रकल्प

**पुणे :** ‘मिटकॉन’च्या बालेवाडी येथील व्यवस्थापन महाविद्यालयाच्या आवारात सौर ऊर्जा प्रकल्पाची उभारणी करण्यात आली आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन पालकमंत्री गिरीश बापट यांच्या हस्ते झाले. यावेळी मिटकॉनचे अध्यक्ष प्रदीप बावडेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष दीपक झाडे, संचालक गणेश राव उपस्थित होते. भारताच्या बहुतेक सर्व प्रदेशात वर्षांतील आठ ते नऊ महिने स्वच्छ सूर्यप्रकाश उपलब्ध आहे. त्यामुळे गृहनिर्माण संस्था, शैक्षणिक, व्यापारी संकुले, रुग्णालये यांनी सौर ऊर्जेचा वापर करावा, असे आवाहन बापट यांनी केले. उद्योगांना सल्ला देताना आर्थिक नफा–तोट्या बरोबरच प्रकल्पांच्या पर्यावरणीय परिणामांचा साकल्याने विचार करण्याची सवय आपल्याला लागली. त्यातूनच इंडस्ट्रियल एनर्जी सेव्हिंग, पॉवर जनरेशन, पर्यावरणपूरक प्रक्रिया याबद्दल उद्योगांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी मिटकॉनने पुढाकार घेतला आहे, असे झाडे यांनी यावेळी सांगितले.